लोकमत

# ‘ॲग्रोव्हिजन’ १० नोव्हेंबरपासून

## उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू येणार : शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** विदर्भाच्या शेतकऱ्यांसाठी संपन्नतेचा महामार्ग ठरत असलेले मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ‘ॲग्रोव्हिजन’ येत्या १० ते १३ नोव्हेंबर दरम्यान नागपुरातील रेशीमबाग मैदानावर आयोजित होणार आहे. प्रदर्शनाचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, जहाज बांधणी व जलसंपदा मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. या प्रदर्शनाला उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू हे देखील भेट देणार आहेत.

गडकरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीवर असलेल्या ४०० हून अधिक कृषी कंपन्या, संशोधन संस्था, नवउद्योजक, शेतकरी संशोधक, वित्त संस्था, कृषी विद्यापीठ, शेतीशी संबंधित शासकीय विभाग यात सहभागी होतील. येथे शेतकऱ्यांसमोर नवे तंत्रज्ञान व शोध सादर केले जातील. येत्या ‘ॲग्रोव्हिजन’मध्ये स्वतंत्र पशुदालन उभारले जाईल. यात शेळ्या, मेंढ्या, गाई, म्हशी, कोंबड्या आदी विविध प्रजातींचे पशुधन पाहण्याची व अभ्यासण्याची संधी मिळेल. गरजेहून ‘अधिक शेती उत्पादनाचे व्यवस्थापन’ आणि ‘बांबू लागवड व त्यातील संधी’ या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होईल. विदर्भातील दुग्ध उत्पादनाची सद्यस्थिती व होऊ शकणारी प्रगती यावर तज्ज्ञांची परिषद होईल. या प्रदर्शनाला दरवर्षी देशभरातील शेतकरी भेट देतात. विदर्भातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गडकरी यांनी केले. या वेळी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी खासदार दत्ता मेघे, आ. अनिल बोंडे, ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, संयोजक गिरीश गांधी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर उपस्थित होते.

### गडकरींनी केले ॲप लॉन्च

यावेळी गडकरी यांच्या हस्ते ‘ॲग्रोव्हिजन’ ॲपचे उद्घाटन करण्यात आले. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना प्रदर्शनाची संपूर्ण माहिती मिळेल. सोबत भविष्यात शेतकऱ्यांना कृषी विषयक मार्गदर्शनही उपलब्ध होणार आहे.

### नवसंशोधकांना एक लाखांचे साहाय्य

कृषी क्षेत्रातील विद्यार्थी आणि शेतकरी यांच्या शेतीतील नवसंशोधन व नाविन्यपूर्ण प्रयोगांना चालना देण्यासाठी ॲग्रोव्हिजन फाऊंडेशनच्या तज्ज्ञ समितीने निवडलेल्या प्रयोग किंवा तंत्रज्ञानास एक लाख रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनात्मक साहाय्य देण्यात येणार आहे. संबंधितांनी आपली संकल्पना, विषय, प्रयोगाची माहिती सप्टेंबर अखेरपर्यंत ॲग्रोव्हिजनकडे पाठवावी, असे आवाहन गडकरी यांनी केले.